प्रेस नोट
आयुक्तालय अमरावती शहर
गुन्हे शाखा युनिट क्रं. ०१ कडबी बाजार
मसांनगज अमरावती
mebranch.cpamp@mahapolice.gov.in
Office No. 0721-2550181

## गुन्हे शाखा युनिट क्रं.१ यांनी अवैधरित्या ऑटोमध्ये गॅस रिफीलींग करणारा आरोपी ताब्यात घेवून २,६७,०००/-रु. चा मुददेमाल जप्त केल्या बाबत

दिनांक १५/०२/२०२५ रोजी गुप्त बातमीदार यांचे कडून माहिती प्राप्त झाली की, लालखडी परिसरातील ईमाम नगर येथे घरगुती वापराचा एल.पी.जी. गॅस सिलेंडर अवैधरित्या ऑटोमध्ये रिफीलींग होत आहे, अशा खात्रीशीर माहितीवरुन गुन्हे शाखा युनिट क्रं. ०१ चे अधिकारी व अंमलदार यांनी ईमाम नगर येथे छापा टाकला असता टीनाचे शेडमध्ये एक ईसम हा अर्धा हार्स पावरची गॅस रिफलींग मशीन तसेच एका प्लॉस्टीक पाईप चे सहायाने ॲटोचे गॅस टॅक मध्ये गॅस भरत असतांना मिळून आला तसेच सदर ठिकाणी दोन ॲटो हे गॅस भरण्यासाठी आलेले होते घरगुती वापराचे सिंलेडर मधुन ऑटोमध्ये रिफीलींग करीत असतांना मिळून आल्याने आरोपी नामे शहजाद परवेज अब्दूल झहीर वय ३७ वर्षे रा. इमाम नगर पो. स्टे.नागपूरी गेट अमरावती यास ताब्यात घेतले व पुढील कारवाईसाठी पो.स्टे. नागपूरी गेट यांचे ताब्यात देण्यात आले. सदर बाबत पो.स्टे. नागपूरी गेट येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल खालील प्रमाणे .

| | | |
|---|---|---|
| १) किं. अं. | ५५,००० रू. | २२ नग भारत कंपनीचे घरगूती भरलेले सिलेंडर |
| २) किं. अं. | २,००० रू. | एक नग भारत कंपनीचे घरगूती खाली सिलेंडर |
| ३) किं. अं. | ५,०००रू. | एक पिवळया रंगाची हाफ हाउस पॉवरची गॅस भरण्यासाठी वापरत असलेली मशीन |
| ४) किं. अं. | ५,००० रू. | एक इलेक्ट्रीक वजन काटा किंमत अंदाजे |
| ५) किं. अं. | २,००,००० रू. | दोन सवारी ॲटो १) ॲटो क्रं.एम.एच २७/बि.डब्लू/५३५५<br>२) ॲटो क्रं.एम.एच २७/पि./८२१८ |

असा एकुण २,६७,००० रू. चा मुददेमाल,

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, नवीनचन्द्र रेडडी सर, मा. पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय) कल्पना बारवकर मॅडम, मा. पोलीस उपआयुक्त श्री. सागर पाटील सा.(परिमंडळ- ०१), मा.सहायक पोलीस आयुक्त,(गुन्हे विभाग) श्री. शिवाजी बचाटे, सहायक पोलीस आयुक्त (गाडगेनगर विभाग) श्री.संजय खताळे सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पोउपनि प्रकाश झोपाटे, पोहवा सतीष देशमूख, पोहवा फिरोज खान, पो.हे.कॉ. सचिन बहाळे, पो.हे.कॉ. अलीमउददीन खतीब, नाईक पोलीस अमंलदार नाझीमउददीन सैयद, विकास गुढधे, सचिन भोयर, पोलीस अमलदार सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक- रोशन माहुरे, किशोर खेंगरे, गुन्हे शाखा युनिट क्रंमाक -०१ यांनी केलेली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर